नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

| वर्ष - ३ रे<br>Year - 3rd | अंक - २९३<br>Issue - 293 | वार रविवार दि. १५ मार्च २०२६<br>Blow- Sunday Date 15 March 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com<br>वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४<br>Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये<br>Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026<br>ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |
|---|---|---|---|---|---|---|

## राज्यात गॅस सिलेंडरची टंचाई नाही

### गॅस एजन्सीबाहेरील रांगा काँग्रेसचं षडयंत्र : मुख्यमंत्री फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर: भारताचे शिप हामुर्झमधून येत आहे, याचा आनंद आहे. मात्र, आंतरराष्ट्रीय परिस्थिती पाहता या गोष्टींवर केंद्र सरकार अधिकृतरित्या मत व्यक्त करेल. मात्र, जे मोदींच्या क्षमतेवर शंका व्यक्त करत होते, त्यांना मोद-ींनी आपल्या कृतीतून उत्तर दिले आहे, असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी इराणच्या भूमिकेचं स्वागत केलं. तसेच, अमेरिकेतील नेतेही सांगत आहेत की, आज जगात संघर्ष थांबवण्याची क्षमता म ोदींमध्ये आहे. त्यामुळे, आपल्या देशातील बडबड आणि फडफड करणाऱ्या नेत्यांनी ही स्थिती समजून घेतली पाहिजे आणि गप्प राहिले पाहिजे, असेही फडणवीसांनी म्हटले.

जागतिक व्यापाराची जीवनवाहिनी मानली जाणारी ‘स्ट्रेट ऑफ होर्मुझ’ सध्या जगातील सर्वात धोकादायक ठिकाण बनली आहे. या सागरी मार्गावर इराणने आपले नियंत्रण घट्ट केले असून, अमेरिकेच्या वाढत्या लष्करी लष्करी हालचालींमुळे येथे कधीही मोठा भडका उडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. इराणने अधिकृतपणे हा मार्ग पूर्णपणे बंद केला नसला तरी, त्यांनी एक 'नवी चाल' खेळली आहे. इराण केवळ त्यांच्या अटी मान्य करणाऱ्या आणि मित्रराष्ट्रांच्या जहाजांनाच या मार्गातून जाण्याची परवानगी देत आहे. भारताने आपल्या मुत्सद्देगिरीच्या जोरावर मोठा विजय मिळवल्याचे बोलले जात आहे. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने इराणसोबत केलेल्या यशस्वी चर्चे नंतर, भारतीय ध्वज असलेल्या तेलवाहू जहाजांना 'सुरक्षित मार्ग' देण्यात आल्याचा दावा केला जात आहे. त्याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीसांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींचं कौतुक केलंय. अमेरिकेतील ने-तेही सांगत आहेत की, आज जगात संघर्ष थांबवण्याची क्षमता मोदींमध्ये आहे. त्यामुळे, आपल्या देशातील बडबड आणि




फडफड करणाऱ्या नेत्यांनी ही स्थिती समजून घेतली पाहिजे आणि गप्प राहिले पाहिजे, असेही फडणवीसांनी म्हटले.

आखाती देशातील युद्धजन्य परिस्थितीमुळे भारतातील इंधन पुरवठा आणि गॅस पुरवठ्यावर मोठा परिणाम झाल्याचं पाहायला मिळत आहे. गॅस वितरणाच्या त्रुटीमुळे गॅस एजन्सीबाहेर नागरिकांची गर्दी झाल्याचं दिसून येतं. त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी काँग्रेसलाही लक्ष्य केलं. गॅस एजन्सीबाहेर नागरिकांची गर्दी होत नाही. तर काँग्रेसच्या नेत्यांनी लोकांमध्ये जो पॅनिक तयार केला आहे, त्यामुळे ही गर्दी होत आहे. म ोठ्या प्रमाणात लोकांमध्ये पॅनिक निर्माण करण्याचा षडयंत्र काँग्रेसने केलंय, असा आरोप फडणवीस यांनी केलाय.

वारंवार देशाच्या सरकारने सांगितले आहे की, घरगुती गॅस, पेट्रोल, डिझेल याचा तुटवडा आपल्याकडे नाही. रेशनिंगही करण्यात आलेलं नाही. मात्र, तरीही काँग्रेसकडून लोकांना भडकवले जात आहे, रांगा लावायला लावल्या जात आहेत, हे षडयंत्र आहे, असे फडणवीसांनी म्हटले. त्यावर, काँग्रेसचे षडयंत्र असल्याचा तुमचा आरोप आहे, याचे काही पुरावे आहे का? असा प्रश्न मुख्यमंत्र्यांना विचारण्यात आला होता. त्यावर, पुरावे काय द्यायचे? स्वतः राहुल गांधी सांगत आहेत, नाना पटोलेही तेच करत आहे, वडेट्टीवारही तेच करत आ-हेत आणखी किती पुरावे पाहिजे? असा प्रतिसवालच फडणवीसांनी केला.

## ‘पंतप्रधान सूर्य घर’ योजनेत देशात महाराष्ट्र अव्वल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जेच्या दिशेने सुरू असलेल्या 'पंतप्रधान सूर्य घर : मोफत वीज' योजनेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्राने देशात अव्वल स्थान पटकावले आहे. निवासी घरांच्या छतावर सौर यंत्रणा बसविण्यात महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकाचे राज्य ठरले असून, देशातील एकूण सौर संचांपैकी सुमारे २० टक्के वाटा एकट्या महाराष्ट्राचा आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी दिली.

नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाच्या ताज्या आकडेवारीनुसार, ऑक्टोबर २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या अवघ्या पाच महिन्यांच्या कालावधीत महाराष्ट्रात १ लाख ८ हजार ३२७ घरांमध्ये सौर यंत्रणा कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. राज्याने या कामगिरीच्या जोरावर उत्तर प्रदेश आणि गुजरात सारख्या सौर ऊर्जेत आघाडीवर असलेल्या राज्यांनाही मागे सारले आहे.

महाराष्ट्रातील सौर यंत्रणांच्या स्थापनेचा वेग लक्षवेधी आहे. ताज्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्राने उत्तर प्रदेश (९५ हजार ६६५) आणि गुजरात (९४ हजार ३६४) या राज्यांवर मात केली आहे. विशेष म्हणजे, राजस्थान, आसाम, छत्तीसगड आणि ओडिशा या चार राज्यांची एकत्रित आकडेवारी गृहीत धरली, तरी महाराष्ट्रातील सौर संचांची संख्या त्यापेक्षा जास्त आहे. केरळ, मध्य प्रदेश, हरियाणा, उत्तराखंड आणि जम्मू-काश्मीर या पाच राज्यांच्या एकत्रित संख्येपेक्षाही महाराष्ट्र सौर ऊर्जे च्या प्रसारात आघाडीवर आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या योजनेमुळे नागरिकांना मोफत किंवा स्वस्त वीज मिळण्यासोबतच कार्बन उत्सर्जन कमी करण्यास मदत होत आहे. पंतप्रधानांच्या दूरदर्शी नेतृत्वामुळे देशात स्वच्छ ऊर्जेचा वापर वाढला असून, महाराष्ट्राने या मोहिमेत अग्रस्थान मिळवून देशाला नवी दिशा दिली आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

कोणत्या राज्यात किती सौर यंत्रणा?

महाराष्ट्र : १,०८,३२७ उत्तर प्रदेश : ९५,६६५ गुजरात : ९४,३६४ आंध्र प्रदेश : ३०,९१५ राजस्थान : ३९,४८४

## काँग्रेसकडे निराशेत स्वत:चे कपडे फाडण्याव्यतिरिक्त काहीही शिल्लक नाही; पंतप्रधान मोदींची काँग्रेसवर जोरदार टीका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आसाम : आसाम सोबतच देशातील बहुतेक राज्यांमध्ये जनतेने काँग्रेसला बाहेरचा रस्ता दाखवला आहे. त्यामुळे सतत हरणारी काँग्रेस लवकरच पराभवाचे शतक पूर्ण करेल. पराभवाच्या याच नैराश्यातून काँग्रेसने देशविरोधात मोर्चा उघडल्याची घणाघाती टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली. आसाममध्ये आज, शनिवारी (१४ मार्च) पंतप्रधानांच्या हस्ते शिलाँग-सिलचर कॉरिडोरचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी आयोजित सभेत ते बोलत होते.

याप्रसंगी गेल्या महिन्यात भारत मंडपम येथे झालेल्या एआय समिटदरम्यान काँग्रेस सदस्यांनी केलेल्या आंदोलनाचा उल्लेख करत मोदी म्हणाले की, एआय समिटला बदनाम करण्याच्या प्रयत्नात काँग्रेसने विचित्र प्रकारचे आंदोलन केले. त्यांनी सार्वजनिक ठिकाणी स्वतः चे कपडे फाडून निषेध नोंदवला.या आंदोलनावर टीका करताना मोदी म्हणाले की, आता काँग्रेसकडे निराशेत स्वतःचे कपडे फाडण्याव्यतिरिक्त काहीही शिल्लक नसल्याचे दिसून येते.



आसामच्या युवकांविषयी बोलताना पंतप्रधानांनी सांगितले की, काँग्रेसने असमला ‘फोडा आणि राज्य करा’ या धोरणाची प्रयोगशाळा बनवली होती. मात्र आज असमच्या युवकांसमोर संधींचे विस्तीर्ण आकाश खुले झाले आहे. तसेच काँग्रेसने ईशान्य भार-ताला अनेक वर्षे दुर्लक्षित केले. स्वातंत्र्यानंतर सीमारेषा अशा पद्धतीने निश्चित करण्यात आल्या की बराक खोऱ्याचा समुद्राशी असलेला संपर्क पूर्णपणे तुटल्याचे मोदींनी नमूद केले. बराक खोरे एकेकाळी महत्त्वा-चे व्यापारमार्ग आणि औद्योगिक केंद्र म्हणून ओळखले जात हो-ते, पण त्याची ताकद हिरावून घेतली गेली. स्वातंत्र्यानंतरही अनेक दशकं काँग्रेस सत्त-ेत होती, तरीही बराक खोऱ्याच्या विकासासाठी कोणतेही ठोस पाऊल उचलले गेले नसल्याची टीका त्यांनी केली.

पंतप्रधानांनी ठामपणे सांगितले की, असममधील भाजपच्या नेतृत्वाखालील डबल-इंजिन सरकार बराक खोऱ्याला बदलण्यासाठी आणि त्याला पुन्हा व्यापार व उद्य-ोगाचे महत्त्वाचे केंद्र बनवण्यासाठी काम करत आहे. जिथे काँग्रेसची विचारसरणी संपते, तिथून आमचे काम सुरू होते. हा ईशान्य भारतातील पहिला एक्सेस-कंट्रोल्ड हाय-स्पीड कॉरिडोर असेल. हा केवळ महामार्ग प्रकल्प नाही, तर ईशान्य भारतातील लोकांच्या दशकांपासूनच्या प्रतीक्षेचा अंत असल्याचे मोदींनी सांगितले.

## पीएम मोदींच्या रॅलीपूर्वी बंगालमध्ये भाजप आणि टीएमसीचे कार्यकर्ते भिडले; एकमेकांवर तुफान दगडफेक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पश्चिम बंगालमधील कोलकाता येथे पंतप्रधान मोदींच्या रॅलीपूर्वी भाजप आणि तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाली. गिरीश पार्क परिसरात दोन्ही गटांनी एकमेकांवर दगडफेक केली. पोलिसांनी गर्दी पांगवली. पश्चिम बंगालच्या उद्योग, वाणिज्य आणि उद्य-ोग मंत्री शशी पंजा यांनी आरोप केला की या हाणामारीदरम्यान त्यांच्यावर दगडफेक करण्यात आली.भाजप गुंड नाही, तो खुनी आहे. शशी पंजा यांचं याच परिसरात घर आहे. दरम्यान, कोलकाता येथे भाषण करताना पंतप्रधान म्हणाले की जंगल राज ची उलटी गिनती सुरू झाली आहे. या निर्दयी सरकारचा अंत जवळ आला आहे. पंतप्रधान मोदी आज पश्चिम बंगालच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी कोलकात्याच्या ब्रिगेड परेड ग्राउंडवर १८ हजार ६८० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली. भाजप नेते



आणि पश्चिम बंगालचे राज्यपाल आर. एन. रवी त्यांच्यासोबत व्यासपीठावर उपस्थित होते.

बंगाल सरकारने लोकांना स्थलांतराचा शाप दिला

मोदी म्हणाले, पश्चिम बंगालच्या निर्दयी सरकारने बंगालच्या लोकांना स्थलांतराचा शाप दिला आहे. बंगाल-चे तरुण कठोर परिश्रमात आघाडीवर आहेत. आज बंगालमधील परिस्थिती भयानक आहे. त्यांना पदवी मिळवता येत नाही किंवा रोजगार मिळत नाही. लोकांना कामाच्या शोधात इतर राज्यात स्थलांतर करावे लागत आहे. प्रथम, काँग्रेस, नंतर कम्युनिस्ट, आता तृणमूल काँग्रेस - हे नेते एकामागून एक येऊन आपले खिसे भरत आहेत. आता ही परिस्थिती बदलण्याची वेळ आली आहे. बंगालच्या तरुणांना बंगालमध्ये काम मिळाले पाहिजे आणि तरुणांनी बंगालच्या विकासाचे नेतृत्व केले पाहिजे.

बंगालचा विकास योग्य धोरणांनी होईल

मोदींनी आपल्या भाषणात म्हटले की भाजपा बंगालच्या सर्व महान व्यक्तींनी पाहिलेला बंगाल निर्माण करा. बंगालचा विकास योग्य धोरणे आणि हेतूंनी होईल. सध्या आपण येथे सत्तेत नसलो तरी, भाजप बंगालच्या विकासासाठी दिवसरात्र काम करत आहे. या सर्व प्रकल्पांमुळे बंगाल अधिक चांगले होईल. जनता, शेतकरी, व्यापारी आणि विद्यार्थी यांना त्याचा फायदा होईल.

रॅलीत सहभागी झालेल्यांना चोर म्हणून शिवीगाळ केली

कोलकाता येथील भाषणादरम्यान, पंतप्रधान म्हणाले की, ममतांनी या रॅलीत सहभागी झालेल्या सर्वांना चोर म्हणून शिवीगाळ केली. येथील निर्दयी सरकार गोंधळले आहे. आजही, त्यांनी प्रचंड गर्दी रोखण्यासाठी सर्व शस्त्रे उगारली. त्यांनी पूल बंद केले, वाहने थांबवली, वाहतूक कोंडी केली, झेंडे काढले आणि पोस्टर फाडले, परंतु बंगाल सरकारकडे पहा, ते या गर्दीला थांबवू शकले नाही.

**पुरवठा मंत्री छगन भुजबळांनी दिली माहिती**

**जिल्हा स्तरावर विशेष समित्या स्थापन**

## गेल्या सहा महिन्यांच्या तुलनेत सर्वाधिक सिलेंडर मार्च महिन्यात उपलब्ध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आखाती देशातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील गॅस आणि इंधन पुरवठ्याबाबत अनेक संभ्रम आणि अफवा राज्यात पसरल्या आहेत. राज्यात घरगुती एलपीजीचा तुटवडा नसून, नागरिकांनी इंधन किंवा गॅस तुटवड्याबाबत कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आव-ाहन राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ (उहहरसरप इर्हीक्षलरश्र) यांनी म्हटलं आहे. राज्य शासनाच्या वतीने आपण जनतेला असं आवाहन करत असल्याचंही त्यांनी सांगितलं.

राज्यात घरगुती एलपीजीची दैनंदिन मागणी ९,००० मेट्रिक टन असताना, उत्पादन वाढवून ते ११,००० मेट्रिक टनांपर्यंत नेले आहे. मार्च महिन्यात गेल्या सहा महिन्यांच्या तुलनेत अधिक प्रमाणात सिलेंडर उपलब्ध आहेत. पेट्रोल आणि






डिझेलचाही पुरेसा साठा उपलब्ध असून रिफायनरी पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत. त्यामुळे, घरगुती गॅस सिलेंडरचा पुरवठा सुरळीत होत राहील, याबाबत नागरिकांनी निश्चिंत राहावे, अशी माहितीही छगन भुजबळ यांनी फेसबुक पोस्टवरुन दिलीय.

गॅस पुरवठा साखळीवर देखरेख ठेवण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांच्या नेतृत्वाखाली विशेष समित्या स्थापन केल्या आहेत. रुग्णालये, शाळा, आश्रमशाळा आणि अत्यावश्यक सेवांना गॅस पुरवठा प्राधान्याने मिळेल, याची चोख व्यवस्था करण्यात आली आहे. कोणत्याही तांत्रिक अडचणी किंवा तक्रारींसाठी तालुका व जिल्हा स्तरावर नियंत्रण कक्ष आणि व्हॉट्सअॅप सुविधा तातडीने कार्यान्वित करण्याचे निर्दे श देण्यात आले आहेत. पुरवठा विभाग परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून आहे. राज्यातील गॅस आणि इंधन पुरवठा सुरळीत राहण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

सरकारकडून गॅस पुरवठा सुरळीत असल्याचा दावा करण्यात येत असला, तरी प्रत्यक्षात अनेक भागांत ग्राहकांना वेळेवर सिलेंडर मिळत नसल्याच्या तक्रारी वाढत आहेत. बुकिंग करूनही गॅस उपलब्ध होत नसल्याने नागरिकांना गॅस एजन्सीसमोर तासन्तास रांगेत उभे राहावे लागत आहे. राज्यातील अनेक शहरांमध्ये पहाटेपासूनच गॅस एजन्सी कार्यालयांबाहेर ग्राहकांची मोठी गर्दी होत असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. आता, या पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही गॅस पुरवठ्याबाबत सविस्तर भाष्य केलंय. डझऋ गॅसची कोणतीही कमतरता नाही, काँग्रेस पक्ष लोकांच्या मनात भीती तयार करतोय, असा आरोप मुख्यमंत्र्यांनी केलाय.


## भारतातील एलपीजीचा तुटवडा दूर होण्याची चिन्हे; दोन भारतीय जहाजे सुरक्षित होर्मुझपार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: आखाती देशांतून एलपीजी घेऊन निघालेली दोन भारतीय जहाजे शनिवारी पहाटे होर्मुझ सामुद्रधुनीतून सुरक्षित पार झाली. ९२,७०० टन एलपीजी असलेली ही जहा-जे दोन ते तीन दिवसांत गुजरातच्या बंदरांमध्ये दाखल होतील, अशी माहिती केंद्र सरकारने दिली. त्यामुळे भार-तातील एलपीजीचा तुटवडा दूर होण्याची चिन्हे आहेत.

शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडची शिवालिक आणि नंदादेवी ही एलपीजीव-ाहक जहाजे गुजरातमधील मुंद्रा आणि कांडला बंदरांकडे रवाना झाली आहेत. या जहाजांवर ९२,७०० टन एलपीजी आहे. शिवालिक जहाज सोमवारी (१६ मार्च रोजी) मुंद्रा येथे, तर नंदादेवी जहाज मंगळवारी (१७ मार्च रोजी) कांडला बंदरात दाखल होण्याची शक्यता आहे, अशी माहिती जहाजबांधणी व जलमार्ग मंत्रालयाचे विशेष सचिव राजेशकुमार सिन्हा यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सामुद्रधुनीच्या पश्चिम बाजूला अडकलेल्या २२ भारतीय ध्वजांकित जहाजांपैकी सहा एलपीजीवाहक, एक द्रवीकृत नैसर्गिक वायू (एलएनजी) वाहक, चार कच्चे तेलवाहक, एक रासायनिक उत्पादने वाहून नेणारे, तीन कंटेनर जहाजे आणि दोन मालवाहू जहाजे आहेत.




उर्वरित जहाजांपैकी एक ड्रेजर असून दुसरे रिकामे आहे, त्यावर कोणताही माल नाही. इतर तीन जहाजे ड्राय डॉकमध्ये आहेत, म्हणजेच त्यांची नियमित देखभाल सुरू आहे, अशी माहिती सिन्हा यांनी दिली.

# बहुजन नायक कांशीराम : समतेच्या क्रांतीचा धगधगता प्रवास

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारतीय लोकशाहीच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की ज्यांनी केवळ राजकारण केले नाही, तर समाजाच्या विचारविश्वाला नवी दिशा दिली. ज्यांनी वंचित, उपेक्षित आणि शोषित समाजाच्या मनात आत्मसन्मानाचा दीप प्रज्वलित केला. अशाच थोर व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे कांशीराम. बहुजन समाजाच्या राजकीय सक्षमीकरणाचा नवा अध्याय लिहिणारे, सामाजिक न्यायाचा लढा राजकारणाच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहोचवणारे आणि दलित-बहुजन चळवळीला संघटनात्मक बळ देण-ारे हे महान नेते होते. आज त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या विचारांचा, संघर्षाचा आणि त्यागाचा स्मरण करताना एक प्रश्न प्रत्येकाच्या मनात उभा राहतो, कांशीरामांनी पेटवलेली समतेची ज्योत आज किती तेजाने पेटते आहे? कांशीराम यांचा जन्म १५ मार्च १९३४ रोजी पंजाबमधील रूपनगर जिल्ह्यातील एका साध्या कुटुंबात झाला. साध्या कुटुंबातून आलेल्या या युवकाने लहानपणापासूनच सामाजिक विषमतेचा अनुभव घेतला. शिक्षण पूर्ण करून त्यांनी सरकारी नोकरी स्वीकारली. परंतु नोकरी करत असतानाच त्यांना भारतीय समाजा-तील जातीय विषमता, अन्याय आणि सामाजिक भेदभाव यांची तीव्र जाणीव झाली. या अनुभवांनी त्यांच्या मनात प्रश्न निर्माण केला, बहुजन समाजाला खऱ्या अर्थाने सन्मानाचे जीवन कधी मिळणार? या प्रश्नाचे उत्तर शोधताना त्यांच्या आयुष्याची दिशा बदलली.

कांशीराम यांच्या विचारांवर सर्वाधिक प्रभाव होता तो डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्त्व-ज्ञानाचा. डॉ. आंबेडकरांनी दिलेला शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश त्यांनी केवळ ऐकला नाही, तर तो आपल्या आयुष्याचा ध्यास बनवला. त्यांना ठाम विश्वास होता की सामाजिक परिवर्तन केवळ आंदोलनांनी घडत नाही; त्यासाठी राजकीय सत्ता मि ळवणे अत्यावश्यक आहे. कारण सत्ता नसलेल्या समाजाला न्याय मिळवणे कठीण असते. कांशीराम यांची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्यांची संघटनात्म क क्षमता. १९७० च्या दशकात त्यांनी बामसेफ या संघटनेची स्थापना केली. या संघटनेचे उद्दिष्ट होते, सरकारी सेवेत असलेल्या मागासवर्गीय आणि अल्पसंख्याक कर्मचाऱ्यांना सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत सहभागी करणे. या संघटनेमुळे हजारो सुशिक्षित तरुण सामाजिक चळवळीत सक्रिय झाले. यानंतर त्यांनी दलित शोषित समाज संघर्ष समिती (डीएस-४) ही संघटना स्थापन केली. या चळवळीने देशभरात बहुजन समाजात आत्मसन्मानाची भावना निम र्ण केली.





– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com


१९८४ मध्ये कांशीराम यांनी बहुजन समाज पार्टी या पक्षाची स्थापना केली. हा पक्ष केवळ राजकीय संघटना नव्हता; तो बहुजन समाजाच्या स्वाभिमानाचा राजकीय मंच होता. कांशीराम यांचा प्रसिद्ध नारा होता जिसकी जितनी संख्या भारी, उसकी उतनी हिस्सेद-ारी. हा नारा केवळ घोषवाक्यच नव्हता, तर भारतीय लोकशाहीतील प्रतिनिधित्वाच्या प्रश्नाला दिलेले स्पष्ट उत्तर होते. कांशीराम यांच्या चळवळीने दलित-बहुजन समाजात एक नवा आत्मविश्वास निर्माण केला. शतकानुशतके सामाजिक अन्याय सहन करणाऱ्या समाजाला त्यांनी सांगितले, तुम्ही केवळ मतदार नाही, तर तुम्ही सत्तेचे भागीदार आहात. हा संदेश लाखो लोकांच्या मनात आशेचा किरण ठरला. त्यांच्या नेतृत्वाखाली बहुजन समाजाने राजकीय शक्तीचे महत्त्व आ-ेळखले.

कांशीराम यांचे आणखी एक मोठे योगदान म्हणजे त्यांनी नवे नेतृत्व घडवले. त्यांनी राजकारणात पुढे आणलेले नाव म्हणजे म ायावती. साध्या पार्श्वभूमीतून आलेल्या मायावती यांना त्यांनी राजकारणात घडवले आणि पुढे त्या उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्री बनल्या. हा केवळ एका व्यक्तीचा राजकीय प्रवास नव्ह-ता; तर तो बहुजन समाजाच्या राजकीय उभारणीचा प्रतीकात्म क क्षण होता. कांशीराम यांचे आयुष्य हे वैयक्तिक सुख-सोयींपासून दूर असलेले होते. त्यांनी स्वतःसाठी संपत्ती जमवली नाही, सत्तेचा वैभव उपभोगला नाही. त्यांचे संपूर्ण आयुष्य बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी समर्पित होते. ते अनेकदा म्हणायचे, मी माझे आयुष्य बहुजन समाजाला समर्पित केले आहे. हा शब्द केवळ भाषणाचा भाग नव्हता; तर तो त्यांच्या जीवनाचा सत्य होता.

आज भारताने आर्थिक प्रगती केली आहे, तंत्रज्ञानात झपाट्याने प्रगती केली आहे. परंतु सामाजिक समतेचा प्रश्न अजूनही पूर्णपणे सुटलेला नाही. जातीय भेदभाव, सामाजिक विषमता आणि संधींचे असमान वितरण अजूनही अनेक ठिकाणी दिसते. अशा वेळी कांशीराम यांचे विचार पुन्हा आठवतात. कारण त्यांनी दिलेला संदेश आजही तितकाच म हत्त्वाचा आहे. सामाजिक न्यायासाठी राजकीय सशक्तीकरण आवश्यक आहे. भारतीय लोकशाहीची खरी ताकद विविधतेत आहे. परंतु ही विविधता तेव्हाच अर्थपूर्ण ठरते जेव्हा प्रत्येक समाजघटकाला समान संधी मिळते. कांशीराम यांची बहुजन विचारसरणी ही केवळ एका समाजापुरती मर्यादित नव्हती; ती समता, प्रतिनिधित्व आणि न्याय या मूल्यांवर आधारित होती. आजही या विचारांची गरज तितकीच आहे.

कांशीराम यांचा संघर्ष आपल्याला एक महत्त्वाचा धडा देतो. परिस्थिती कितीही कठीण असली तरी संघटन आणि जागृतीच्या बळावर परिवर्तन घडवता येते. त्यांनी शून्यातून चळवळ उभी केली आणि लाखो लोकांच्या मनात स्वाभिमान निर्माण केला. हा प्रवास खरोखरच प्रेरणादायी आहे. आज बहुजन नायक कांशीराम यांच्या जयंतीनिमित्त त्यांचे स्मरण करताना आपण केवळ श्रद्धांजली अर्पण करणे पुरेसे नाही. तर त्यांच्या विचारांना आणि संघर्षाला पुढे नेणे हीच त्यांच्यावरील खरी आदरांजली ठरेल. कारण त्यांनी दिलेला संदेश आजही तितकाच जिवंत आहे. समता ही केवळ संविधानातील शब्द नसून ती प्रत्येकाच्या आयुष्यात उतरली पाहिजे. बहुजन समाजाच्या सन्मानासाठी, सामाजिक न्यायासाठी आणि समतेच्या भारतासाठी आयुष्य अर्पण करणाऱ्या या महान नेत्याला त्यांच्या ९२ व्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन. त्यांच्या विचारांची ज्योत अशीच पेटती राहो आणि समाजाला समतेच्या मार्गावर पुढे नेत राहो, हीच खरी कृतज्ञता.

# भारतीय दलित पँथर चे लढाऊ नेते प्रा. अरुण कृष्णाजी कांबळे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारतीय दलित पँथर चे लढाऊ नेते, नामांतर लढा व मंडल आयोग अंमलबजावणीचा पाठपुरावा करणारे, बौद्धांना केंद्रीय स्तरावर आरक्षण मिळावे म्हणून झटणारे अग्रणी नेते आणि अभ्यासु प्रभावी वक्ते प्रा. अरुण कृष्णाजी कांबळे.

प्रा. अरुण कांबळे यांनी नामांतर लढ्याच्या म ाध्यमातून चळवळीला नवसंजीवनी मिळवून दिली. नामांतराचे दिवस हा त्यांचा 'नवशक्ति'त प्रसिद्ध झा-लेला लेख. असाच एक माईलस्टोन. नव्या रक्ताला नवी प्रेरणा देणारा हा लेख...

नामांतराचे दिवस

दिनांक १० एप्रिल १९७७ रोजी औरंगाबाद येथे दलित पँथरच्या अध्यक्षपदी माझी नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला. याचवेळी मराठवाडा विद्यापीठाचे नाव 'डॉ. आंबेडकर विद्यापीठ' असे ठेवण्यात यावे, असा ठरावही पहिल्यांदाच करण्यात आला. माझ्या पत्रकार परिषदेत हा आणि अन्य ठराव घोषितही करण्यात आले. मराठवाडा विद्यापीठ नामांतराचा प्रश्न अशा रीतीने सुरू झाला. भडकल गेट येथील जाहीर सभेत त्याची वाच्यता जाहीरपणे झाली. याच अधिवेशनातील एका सत्रात प्राचार्य मनोहर भि. चिटणीस व प्रा. गंगाधर पानतावणे यांची व्याख्यानेही झाली. दलित पँथरची आवश्यकता या दोघांनीही प्रतिपादिली व मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ' असे होणे योग्य आहे यासंबंधी समर्थ युक्तिवाद केले. नामांतर आंदोलनाच्या जन्मकाळचे हे दोन साक्षीदार!

वस्तुत: नामांतराचा प्रस्ताव हा इतर दहा प्रस्तावांपैकी एक होता. पण या प्रस्तावाला महत्त्व आले आणि महाराष्ट्राच्या व देशाच्या राजकारणातील, समाजकारणातील तो एक म हत्त्वाचा प्रश्न बनला. दलित चळवळ गेली १६ वर्षे याच प्रश्नाला केंद्रबिंदू मानून चालू राहिली.

सांगली जिल्ह्यातील करगणी नावाच्या छोटयाशा खेड्यात जन्मलेला मी 'दलित पँथर' सारख्या महाराष्ट्रात आणि देशात आंबेडकरी आंदोलनाचे पर्व निर्माण करणार्या, दलित सेना, दलित महासभा, दलित कृती समिती, बहुजन समाज पार्टी आदी संघटनांना, पक्षांना देशभर जन्माला घालणार्या वादळाचा अधिनायक बनलो हे आश्चर्यच! त्यावेळी माझे वय होते अवघे तेवीस वर्षे.

आई-वडील शिक्षक. आंबेडकरी विचारांचं बाळकडू लाभलेलं. शिकायला म्हणून प्रारंभी सांगलीला आणि नंतर एम.ए. साठी म्हणून मुंबईला आलो. शिक्षण आणि चळवळ एकत्रित सुरू. समजलं तेव्हापासून गाणं, लिहिणं, वाचणं सुरू. तक्क्यात सर्वांना 'प्रबुद्ध भारत' वाचून दाखवण्याचं काम माझे वडील मला कौतुकानं सांगायचे. त्यातून माझा पिंड पोसला आणि दलित साहित्याची-दलित पँथरची चळवळ सुरू झाली. तेव्हा माझा सूर मला सापडला.

पुढे, राजा ढाले यांनी दलित पँथर बरखास्त करून मास मूव्हमेंट सुरू करण्याचा निर्णय घेतला. आम्हाला हा निर्णय मान्य झाला नाही. आम्ही दलित पँथरच चालू ठेवणार असे घोषित करून कामाला लागलो. त्यावेळचे माझे साथीदार होते रामदास आठवले, एस.एम.प्रधान, उमाकांत रणधीर, दयानंद म्हस्के, गंगाधर गाडे, प्रीतम कुमार शेगावकर, विठ्ठलराव साठे आदी. सगळ्यांनी मिळून अध्यक्षस्थानी माझी निवड केली. एस. एम. प्रधान उपाध्यक्ष, गाडे सरचिटणीस, आठवले संघटक, म्हस्के चिटणीस असे पदाधिकारी निवडले गेले आणि दलित पँथर पुनश्च उभी राहिली.

नामांतर आंदोलनाने दलित पँथरच्या पुनर्निर्मितीला संजीवनी दिली. मराठवाडयात विद्यापीठ कार्यकारिणीने नामांतराचा प्रस्ताव एक मताने संमत केला. मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी आमच्या शिष्टमंडळाला सांगितले की, लोकांकडून ही मागणी येऊ द्या, आम्ही तिचा आदर करू. झाले! १२ ऑगस्टला दलित पँथरचा विराट मोर्चा घोषित झाला. मुंबईतील एका वृत्तपत्राने या मोर्चाचे वर्णन केले. 'मुंबई नगरीने असा मोर्चा आतापर्यंत पाहिला नव्हता (नवभारत टाइम्स).' सरकारचे धाबे दणाणले. मुख्यमंत्री मुंबईत नव्हते. गृहराज्यमंत्री शरद पवार होते. मोर्चाची लोकशक्ती अफाट होती. लोकांनी ओव्हल मैदान व्यापून टाकले. पोलिसांचे डोळे फिरले आणि मोर्चावर लाठीचार्ज करण्यात आला. स्त्रियांना, मुलांना, म्हातार्या-कोतार्यांना जीवघेणी मारहाण झाली. मीही मरता मरता वाचलो. अनिल गोंडाणे नावाच्या एका कार्यकर्त्यांने पोलिस अधिकार्याला पायात पाय घालून पाडले. मी लाठीचार्जच्या तडाख्यातून सुटलो. पोलिसांच्या हल्ल्याचे पहिले लक्ष्य मी होतो.

या लाठीचार्जनंतर मात्र चळवळ अधिक धारदार बनली. लोक पेटून उठले. आम्ही महाराष्ट्रभर 'जेलभरो आंदोलन' सुरू केले. सुरुवात नांदेड येथून झाली. मी व एस.एम.प्रधान यांच्या नेतृत्वाखाली १०,००० स्त्री-पुरुष तुरुंगात गेलो. हाच प्रकार लातूर-उस्मानाबाद व इतर ठिकाणीही झाला. मी स्वत: जातीने सर्व ठिकाणी या आंदोलनाचे नेतृत्व केले व तुरुंगात भरती झालो. या आंदोलनाचे वैशिष्ट्य म्हणजे स्त्रिया फार मोठया प्रमाणात या आंदोलनात सहभागी झाल्या होत्या.

या आंदोलनाचा परिणाम म्हणून २७ जुलै १९७८ रोजी मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्याचा निर्णय नवनिर्वाचित मुख्यमंत्री शरद पवार यांनी घोषित केला.

विधीमंडळात ठराव एकमताने संमत होण्याच्या आदल्या दिवशी कौन्सिल हॉलमध्ये मुख्यमंत्र्यांनी सगळ्या आमदारांची बैठक बोलावली होती. या बैठकीला मला विशेष निमंत्रित म्हणून बोलावले होते. मराठवाडयातील आमदार नामांतरला पाठिंबा देण्याच्या मन:स्थितीत नव्हते. प्रसंग बाका होता. आता काय होणार? मी मुख्यमंत्र्यांची परवानगी घेऊन बोलायला उभा राहिलो.

'' डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि मराठवाडा यांचं अतूट नातं आहे. बाबासाहेब दलितांचे नेते तर मराठवाडा हा कमालीचा दलित प्रदेश! आंबेडकरांनी या भागात पहिल्यांदा शिक्षण नेले. औरंगाबाद महाराष्ट्राची राजधानी करण्याची मागणी केली. निजामाचे संस्थान खालसा करण्यात पुढाकार घेतला. मराठवाड्याची अस्मिता आणि बाबासाहेबांचे नाव यांचे रक्तामांसाचे नाते आहे आणि म्हणून या विद्यापीठाचे नाव 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असे व्ह-ावे. मराठवाडा हा शब्द काढावयाचा नाही. तो तिथे हवाच. हा 'दुग्धशर्करा' योग आहे. माझे सहकारी गाडे यांनी माझ्या भाषणाला पाठिंबा दिला. विधान परिषदेचे तत्कालीन सभापती रा. सु. गवई यांनी या प्रस्तावाचे जोरदार समर्थन केले आणि त्यानंतर मराठवाडयातील आमदारांची मने बदलली. मुख्यमंत्री खूश झाले. त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकिर्दीतील हा पहिलाच निर्णय होता. त्यांनी मनापासून घेतलेला. या निर्णयाची यशस्विता ही त्यांच्या कारकिर्दीची यशस्विता होती. जर 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असे नामांतर व्हावे असा प्रस्ताव मांडला नसता तर म राठवाड्यातील आमदारांनी नामांतर प्रस्तावाला पाठिंबा दिला नसता. ती काळ्या दगडावरची रेघ होती. आम्ही यशस्वी झालो. मराठवाड्यातील आमदार तयार झाले. प्रस्ताव संमत झाला.

प्रस्ताव संमत झाला त्यावेळी आम्ही सभागृहाबाहेर होतो. बाबासाहेबांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून आनंदोत्सव साजरा करीत होतो.

त्याचवेळी मराठवाड्यातून बातमी आली. नामांतर विरोधकांनी प्रतिआंदोलन सुरू केले आहे. आंदोलनाचे स्वरूप तीव्र होऊ लागले. रेल्वेचे रूळ उद्ध्वस्त झाले. सरकारी कार्यालयांची नासधूस झाली. सगळयात भयंकर म्हणजे दलितांच्या संसारांची राख-रांगोळी झाली. मराठवाड्यापायी जिल्ह्यांत सैतानाचा हैदोस सुरू झाला. खून-खराबा झाला. लढतालढता पोच-ीराम कांबळे व जनार्दन मेवाडे हे भीमवीर धारातीर्थी पतन पावले. त्यांच्या लढाईच्या रोमहर्षक कथा आजही डोळयात पाणी उभे करतात. सगळयात अधिक नुकसान नांदेड आणि उस्मानाबाद जिल्ह्यांत झाले. आंदोलकांनी कायदा हातात घेतला. बाबांचे फोटो फोडले, मुलांची पुस्तके फाडली. तांब्या पितळेची भांडी चेचली. म नुस्मृतीचे अधिराज्य सुरू झाले. 'मराठवाडा' पत्राने या काळात आगीत तेल ओतण्याचे कार्य केले.

या सगळया काळात आम्ही जीवाचे रान करून आपद्ग्रस्तांना मदत करीत होतो. पत्थराला पाझर फोडणारी दृश्ये होती. घरटी उद्ध्वस्त झाली. सगळे 'फुकून' टाकले. पण सर्वसामान्य जनतेने नामांतराची मागणी सोडली नाही. जिवाच्या निकराने ते म्हणत होते, 'आमच्या जिवाची-संसाराची राखरांगोळी झाली तरी चालेल, पण नामांतराचा निर्णय बदलू नका.' ही जिद्द केवळ अतुलनीय अशीच होती.

सरकारी मदत चालू झाली. समतावादी पक्ष, संघटना, व्यक्ती फिरू लागल्या. नामांतर आंदोलनाचे स्वरूप या जळितानंतर व्यापक झाले. ते समतेचे आंदोलन झाले.

याच काळातील एक अनुभव सांगण्यासारखा आहे. मी सर्वत्र आपद्ग्रस्तांना भेटी देत होतो. असाच उदगीरला गेलो असताना नळदुर्ग या गावच्या भयंकर हल्ल्याची वार्ता ऐकून तेथे जाण्यासाठी तयार झालो. नळदुर्गचे विनायक बलाडे यांचे घर सुरूंग लावून पाडण्यात आले होते.

मी जायला निघालो आणि माझ्या गाडीपुढे एक माऊली आडवी पडली. उठायला तयार नाही. 'मी अरुणभाऊंना नवदुर्गला जाऊ देणार नाही. त्यांच्या जीवाला धोका आहे.' मी निर्धारपूर्वक सांगितले, 'आपल्या मंडळीचे संसार उद्ध्वस्त होत असताना, त्यांचे खून पडत असताना मी गप्प बसू शकणार नाही. मला तिथे जाऊन जातीयवाद्यांचा बंदोबस्त करणे भाग आहे. आपल्या मंडळींचे सांत्वन करणे आवश्यक आहे.' म ाऊली हटेना. ती म्हणाली, 'आपण लाखांचे पोशिंदे आहात. मी आपल्याला जाऊ देणार नाही. तुम्हाला ते ठार मारतील. आपण जाऊ नका.'

माऊली ऐकायला तयार नाही. मी माघार घेतली. पोलिस स्टेशनला गेलो.नळदुर्गचा वृत्तांत मागव-ला.पोलिस अधिका-याने सांगितले, नळदुर्गच्या आंदोलकांनी तुम्ही जाण्याच्या मार्गावर दगडांनी भरलेल्या बैलगाडया उभ्या केल्या आहेत. तुम्ही जा-ताच, तुमच्यावर वर्षाव करण्याचा त्यांचा बेत होता. माझ्या डोळयांपुढे कृष्णवर्णियांचे चित्र उभे राहिले. 'लिंचिंग'. दगडाने ठेचून मारण्याची घोर शिक्षा! माझा बळी याप्रसंगी जाता तर त्या अज्ञात माऊलीने माझे प्राण वाचवले. असे प्रेम!

(क्रमशः)

– –प्रा. अरुण कांबळे

# जालीहाळचा सुपुत्र मनोज पाटील बल्ला आपीएस, युपीएससी बर्थडे देशात ४९३ वा क्रमांक: आ. समाधान आवताडे यांच्या हस्ते सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मंगळा तालुक्यातील जालीहाळ गा-वचे सुपुत्र चि. मनोज रामचंद्र पाटील यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (UPSC) परीक्षेत देशात ४९३ वा क्रमांक मिळवल-ाखझड पदासाठी निवड मिळवली आहे. यांच्या या उल्लेखनीय यशामुळे संपूर्ण मंगळा तालुक्यात परिसरात आनंदाची वातावरण निर्माण झाली असून विविध स्तरातून त्यांच्यावर अभिनंदन वर्षा होत आहे या उल्लेखनी रेषा बद्दल मंगळवेढा मतदारसंघाचे लोकप्रिय नेते व पाणीदार आमदार आद-रणीय श्री समाधान दादा अव-ताडे यांनी जनसंपर्क कार्यालय, मंगळवेढा येथे मनोज पाटील यांचा सत्कार करून अभिनंदन केले यावेळी त्यांना मनोज पाटील यांच्या चिकाटी परिश्रम आणि सा-थीचे पूर्ण अभ्यासाचे कौतुक करत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



ज्याली हाळ सारख्या ग्रामीण भागातून देशातील सर्वोच्च नागरी सेवा पर्यंत पोहोचवणे हे अत्यंत अभिमानास्पद बाब असून मनोज पाटील यांनी आपल्या जिद्दीच्या जोरावर हे संपादन केले आहे. त्यांच्या या याच्यामुळे मंगळवेढा तालुक्यातील संपूर्ण परिसरातील तरुण-तरुणींना प्रशासकीय सेवेत जाण्याची नवी प्रेरणा आणि दिशा मिळणार असल्याची भावना यावेळी उपस्थित त्यांनी व्यक्त केली या सत्कार समारंभ समारंभास उपनगराध्यक्ष प्राध्यापक श्री वेताळ भगत सर, जिल्हा परिषद सदस्य श्री रमेश भांजे सावकार, जिल्हा परिषद सदस्य श्री जनार्दन मामा शिवशरण, संचालक श्री औदुंबर वाडदेकर संचालक श्री तानाजी भाऊ काकडे मालक, माजी संचालक सुरेश भाकरे साहेब मा मुख्याध्यापक रामचंद्र पाटील सर, उद्योजक श्री सरोज भाई काझी, पंचायत समिती सदस्य श्री विनायकराव मदन माजी पंचायत समिती सदस्य श्री नितीन दादा पाटील श्री आबा कांबळे ग्राम विकास अधिकारी धनंजय पवार भाऊसाहेब नफा प्राथमिक शिक्षण मंडळ सदस्य दिगंबर मामा यादव माजी सरपंच श्री नंदकुमार जाधव यांच्यासह अनेक मान्यवर उप-स्थित होते.

मनोज पाटील यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरा-तून त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत असून त्यांच्या पुढील प्रशासकीय वाटचालीसाठी अध्यक्ष शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहे.

# चंदन उटी पूजा बुकिंगला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मि णी मंदिरे समिती, पंढरपूर येथे आयोजित करण्यात येणाऱ्या चंदन उटी पूजेसाठी भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून सर्व पूजा अल्पावधीतच बुक झाल्या आहेत.

श्री विठ्ठलच्या चंदन उटी पूजेसाठी एकूण ४८ पूजा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. प्रति पूजेस ₹२१,००० इतके देणगी शुल्क निश्चित करण्यात आले होते. भाविकांच्या मोठ्या प्रतिसादामुळे या सर्व पूजा पूर्णपणे बुक झाल्या आहेत.

तसेच श्री रुक्मिणी मातेच्या चंदन उटी पूजेसाठी ४६ पूजा उप-लब्ध करून देण्यात आल्या होत्या. प्रति पूजेस ₹९,००० इतके देणगी शुल्क निश्चित करण्यात आले होते. या सर्व पूजा देखील पूर्णपणे बुक झाल्या आहेत.



चंदन उटी पुजा या भाविकांची गर्दी विचारात घेता चैत्री यात्रा व अधिकमास महिन्याचे दिवस वगळून उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

भाविकांकडून मिळालेल्या या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने व्यवस्थापक संदेश भोसले यांनी भाविकांचे आभार मानले असून सर्व पूजाविधी नियोजित वेळापत्रकानुसार पार पडणार असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# राष्ट्रनिर्मितीसाठी समाजाची भागिदारी महत्वाची

## स्वामी रामदेव बाबा यांचे विचार: 'लाईफ ट्रान्सफॉर्मेशन सेंटर'चे उद्घाटन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : राष्ट्रनिर्मितीसाठी राजकारण नाही तर समाजाची भागिदारी अत्यंत महत्वाची आहे. परिस्थिती आणि संघर्षामुळे प्रतिभा निर्माण होते. या प्रतिभेतूनच निर्मित झालेल्या 'लाईफ ट्रान्सफॉर्मेशन सेंटर' मुळे विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये परिवर्तन घडविण्याचे अद्वितीय कार्य सुरू झाले आहे. हे चारित्र्य, व्यक्ति निर्मिती व त्यातून राष्ट्रनिर्मितीसाठी अमूल्य योगदानाचे ठरेल. असे विचार पतंजली योगपीठाचे संस्थापक व आध्यात्मिक गुरू स्वामी रामदेव बाबा यांनी केले. येथे जीवन परिवर्तन करण्याचे खूप मोठे सूत्र दडल्याचे ही त्यांनी सांगितले.

तत्वदर्शी प्रज्ञावंत वै. सौ. उर्मिला वि. कराड यांच्या स्मृति प्रित्यर्थ देशात प्रथमच उच्च शिक्षणामध्ये दौंड तालुक्यातील बोरीबेल येथे उभारण्यात आलेल्या 'लाईफ ट्रान्सफॉर्मेशन सेंटर' (एलटीसी) च्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामदेव बाबा बोलत होते. अध्यक्षस्थानी एम आयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे होते. तसेच 'लाईफ ट्रान्सफॉर्मेशन सेंटर' चे संकल्पक व निर्माते डॉ. राहुल विश्वनाथ कराड हे उपस्थित होते.

यावेळी लाईफ ट्रान्सफॉर्मेशन सेंटर' (एलटीसी) च्या ब्रोशरचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी पद्मश्री पोपटराव पवार, राजीव गांधी खेल रत्न अवॉर्डी रंजन सोधी, संजीव निकम, नंदकिशार पाचपुते हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच ह.भ.प. श्री.बापूसाहेब मोरे,आमदार रमेशअप्पा कराड, श्री. राजेश कराड, श्री योगेश पाटील, एमआयटी डब्ल्यूपीयूचे सीओओ डॉ. प्रसाद खांडेकर व विद्यार्थी प्रतिनिधी उपस्थित होते.

स्वामी रामदेव बाबा म्हणाले, जीवन परिवर्तनात शिक्षण आणि स्वयंशिस्त महत्त्वाची असते. तरुणांमध्ये प्रचंड क्षमता असते. त्यांनी आपली स्वप्ने पगार पुरतीच मर्यादित न ठेवता समाज व राष्ट्र निर्मितीसाठी योगदान देण्याची असावी. धैर्य, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या माध्यमातून निर्धारित केलेले ध्येय गाठण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करावेत. विचार प्रणाली अत्यंत गतिशिल असल्याने आहार व विचारांप्रती सतत सजग रहावे. तसेच शरीर, मन आणि भावनांना नियंत्रित करावे.

डिजिटल माध्यमांमुळे मुले रोज ८ तास वेळ वाय घालवितात त्यातून त्यांना काहीच उपलब्ध होत नाही. खेड्यांमध्ये काम करण्यासारखे खूप काही आहे. येथे आदर्शग्राम व चारित्र्य निर्मितीसाठी उत्तम शिक्षण व्यवस्था उभी करावी. स्वातंत्र्यानंतर ही देशात भारतीय शिक्षण व्यवस्था पद्धत नाही. त्यासाठी कार्य करावे. असा सल्ला ही स्वामी रामदेव बाबा यांनी दिला.

केंद्रीय कृषि व किसान कल्याण आणि ग्रामविकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी ऑनलाइन भाषणात सांगितले की, जीवन परिवर्तन (एलटीसी) एक अद्वितीय उपक्रम आहे. भारताच्या राष्ट्रीय शिक्षण धोरणातील अनुभवजन्य शिक्षणाचा गाभा आहे. भारताला बलशाली बनवण्यास, आत्मविश्वासू व राष्ट्रनिर्माते युवक घडविण्यास मदत करेल.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऑनलाईन संदेशात सांगितले की, दूरदर्शी विचार करुन डॉ. राहुल कराड यांनी उभारलेल्या जीवन परिवर्तन केंद्र (एलटीसी) प्रकल्पामुळे अत्याधुनिक शिक्षण व्यवस्था व समाजाला नवी दिशा मिळेल. पाच तत्वांवर आधारित केंद्र मानव कल्याणासाठी आहे.

डॉ. राहुल विश्वनाथ कराड म्हणाले, कृषी (शेती) आणि निसर्ग , शारीरिक तंदुरूस्ती आणि खेळ, संघटन कौशल्य आणि नेतृत्व, देशभक्ती आणि राष्ट्रनिर्माण व अध्यात्म आणि मन:शांती या ५ स्तंभावर आधारित हे केंद्र आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या शारीरिक, बौद्धिक व मानसिक आरोग्य जोपासण्याबरोबरच जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण विकसित करण्याचा हा शैक्षणिक क्षेत्रातील मैलाचा दगड आहे. हे केंद्र संपूर्ण भारताचे असून विद्यार्थ्यांनी येथून लाभ घेऊन बाहेर निघावे व देश परिवर्तनासाठी कार्य करावे.

डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, भारताला विश्वगुरूच्या रुपात पाहायचे असेल तर हे केंद्र महत्वाची भूमिका बजावेल. हे केंद्र जीवनाला नवी दृष्टी देणारे आहे. देह, बुद्धि, आत्मा आणि मन या गोष्टीवर लक्ष केंद्रित करावे.

रंजन सोधी म्हणाले, देशात सर्वच क्षेत्राबरोबर शिक्षण व्यवस्थेत ज्या प्रमाणात परिवर्तन घडत आहे. त्यासाठी जीवन परिवर्तन केंद्र महत्वाची भूमिका निभावेल. तसेच जीवनात खेळाबरोबरच संवाद अत्यंत महत्वाचा आहे.

या प्रसंगी राज्याच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार, चंद्रकात पाटील, आमदार दत्तात्रय भरणे व ले. जनरल धिरज सेठ (पीव्हीएसएम, एव्हीएसएम) जनरल ऑफिस कमांन्डिंग इन चीफ सदर्न कमांड यांनी ऑनलाईन शुभेच्छा दिल्या. डॉ. गौतम बापट सूत्रसंचालनयांनी केले. डॉ. प्रसाद खांडेकर यांनी आभार मानले.

# राज्यस्तरीय 'पद्मश्री पु. ल. देशपांडे मुक्तांगण शिक्षकरत्न' पुरस्काराने डॉ. सुवर्णा हजारे डांगे सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर (प्रतिनिधी): पंढरपूर येथील पांडुरंग शिक्षण प्रसारक मंडळाच्या उमा महाविद्यालयातील इतिहास विषयाच्या प्रा. डॉ. सुवर्णा हजारे डांगे यांना विटा (जि. सांगली) येथील भारतमाता ज्ञानपीठ संस्थेतर्फे राज्यस्तरीय 'पद्मश्री पु. ल. देशपांडे मुक्तांगण शिक्षक रत्न' पुरस्कार प्रदान करण्यात आला. मुक्तांगण ग्रंथालय, विटा यांच्या माध्यमातून आयोजित ४४ व्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.




महाराष्ट्र कामगार साहित्य परिषद, पुणेचे अध्यक्ष तथा नामांकित कवी पुरुषोत्तम सदाफुळे पाटील यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, शाल आणि संत तुकारामांची मूर्ती देऊन डॉ. हजारे यांचा गौरव करण्यात आला. या प्रसंगी साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त साहित्यिक आसाराम लोमटे यांच्यासह सुप्रसिद्ध उद्योजक प्रसाद गायकवाड, साहित्यिक शरद तांदळे, दौलतनाना शितोळे, आमदार सुहास बाबर, महेश कदम आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. सुवर्णा हजारे डांगे यांनी साहित्य, मराठी भाषा, इतिहास संशोधन आणि समाजप्रबोधनाच्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. शैक्षणिक सेवेसोबत अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनाधीनतेविरोधी जनजागृती, स्त्रीशक्तीचा जागर आणि विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान व प्रेरणा निर्माण करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत.

'संयुक्त महाराष्ट्र चळवळ व महिला : एक चिकित्सक अभ्यास' या त्यांच्या पीएच.डी. प्रबंधाचे विशेष कौतुक करण्यात आले. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांनी सादर व प्रकाशित केलेले संशोधनपर लेख शैक्षणिक क्षेत्रासाठी मोलाचे ठरले आहेत. शिक्षण, संशोधन आणि समाजप्रबोधन यांचा प्रभावी समन्वय त्यांच्या व्यक्तिमत्त्वात प्रकर्षाने जाणवतो.

हा पुरस्कार भारतमाता ज्ञानपीठचे सचिव वैशाली कोळेकर, कार्याध्यक्ष डॉ. ऋषिकेश मेटकरी आणि संस्थापक रघुराज मेटकरी यांच्या संस्थेतर्फे प्रदान करण्यात आला.

डॉ. सुवर्णा हजारे डांगे या प्रा. डॉ. दत्तात्रय डांगे यांच्या सुविद्य पत्नी आहेत. त्यांच्या या यशाबद्दल पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, प्र कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, उमा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धीरजकुमार बाड, पांडुरंग शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रशांतराव परिचारक, प्राचार्य डॉ. मिलिंद परिचारक, प्रणव परिचारक, तानाजीराव वाघमोडे आदींनी त्यांचे अभिनंदन केले.

डॉ. हजारे यांच्या या सन्मानामुळे शैक्षणिक वर्तुळात विशेष समाधान आणि अभिमान व्यक्त होत आहे.

# कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात कॉमर्स फेस्टिवलचे आयोजन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय हे ग्रामीण विद्यार्थ्यांना उपक्रमशील बनवण्याचे केंद्र बनले आहे. नवीन शैक्षणिक धोरणामुळे व्यवसायाभिमुख विद्यार्थी घडवण्याचे उद्दिष्ट निर्धारित केले आहे. या उद्दिष्टांना प्रमाण मानून महाविद्यालयात कॉमर्स फेस्टिवलचे केलेले आयोजन हे स्तुत्य पाऊल आहे.' असे प्रतिपादन सुहासिनी दुग्धालय उद्योग समूहाचे संस्थापक व नवउद्योजक शशिकांत कराळे यांनी केले.

येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयामधील कॉमर्स व मॅनेजमेंट विभागाच्या वतीने कॉमर्स फेस्टिवल सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी आयोजित उद्घाटनपर भाषणात शशिकांत कराळे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी टी जाधव हे होते.

कराळे पुढे म्हणाले की, या महाविद्यालयातून माझ्यासारख्या विद्यार्थ्यांवर संस्कार झाले. त्यामुळे अनेक विद्यार्थी समाज जीवनात यशस्वीरित्या जगत आहेत. भावी काळात विद्यार्थ्यांनी नोकऱ्यांवर अवलंबून न राहता लहान लहान कौशल्य आत्मसात करावीत. पालकांनी देखील पाल्याच्या केवळ गुणांच्या टक्केवारीकडे लक्ष न देता त्यांच्या व्यावहारीक, कौशल्यपूरक व व्यावसायिक शिक्षणाकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. मुलींच्या सक्षमीकरणासाठी वाणिज्य शाखेकडे व्यावसायिक शिक्षण हे प्रासंगिक असून त्याचा लाभ या कॉमर्स फेस्टिवलच्या माध्यमातून होईल.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. बी टी जाधव म्हणाले की, व्यक्तीमत्व विकास हा कोणत्याही व्यवसाय किंवा उद्योगाची पूर्वअट असते. या दृष्टिने कॉमर्स विभागात विविध क्लब तयार केलेले आहेत. त्या माध्यमातून के. एस. अय्यर, रतनजी टाटा आणि सी.के.प्रल्हाद अशा महान व्यक्तींच्या कार्याची प्रेरणा विद्यार्थ्यांमध्ये रुजावी यासाठी हा उपक्रम राबवला आहे. त्यातून लोकांना रोजगार देणारे विद्यार्थी विकसित होतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या फेस्टिवल सप्ताहामध्ये भित्तीपत्रक, गटचर्चा, प्रश्नमंजुषा, जाहिरात निर्मिती स्पर्धा, निबंध स्पर्धा आयोजित केल्या असून एक दिवसाचे ट्रेड फेअर देखील आयोजित केले आहे. सप्ताहाचा समारोप ग्राहक दिन साजरा करून तसेच स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरीत करून होईल.

या उद्घाटनपर कार्यक्रमात उपप्राचार्य डॉ. सुशील शिंदे, डॉ. अमर कांबळे, डॉ. रमेश शिंदे, डॉ. आनंद शिंदे, प्रा. सागर शिवशरण हे उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सविता उप्पल्ली यांनी केले. तर सूत्रसंचालन बी. कॉम. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनी कु. दाक्षायणी कोळी व कु. प्रगती लवटे तसेच प्रा. प्रगती पारेकर यांनी केले. शेवटी डॉ. सारिका केदार यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# विवेक विचार मंच जिल्हा संयोजिकापदी अश्विनी चव्हाण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : विवेक विचार मंच, सोलापूर शहर व जिल्हा शाखा कार्यकारणी घोषित करण्यात आले असून सोलापूर जिल्हा संयोजिका पदी अश्विनी चव्हाण सह संयोजक पदी अँड प्रशांत कांबळे यांची निवड करण्यात आले या निवडीमुळे सर्वत्र अभिनंदन व शुभेच्छा देण्यात येत आहेत.

सोलापूर जिल्हा कार्यकारिणी पुढील प्रमाणे निवड करण्यात आले.

श्रीमती अश्विनी चव्हाण : जिल्हा संयोजिका, ड.प्रशांत कांबळे : जिल्हा सहसंयोजक, श्री.सिद्धांत बाबरे : शहर संयोजक,श्री.धानेश लिगाडे: विमर्श प्रमुख,श्रीमती. सीमा भंडारी: सह विमर्श प्रमुख,ड.संदेश देवकर : मीडिया प्रमुख, ॲड.जयराज नंदुरकर : सह मीडिया प्रमुख,श्रीमती प्रीती उडाणशिव : कार्यक्रम प्रमुख,ड. आरती आंबीगार : कार्यक्रम सह प्रमुख,ड.वैशाली महिंद्रकर : विधी प्रमुख, ड.जितेंद्र मोरे : सह विधी प्रमुख,ऍड. लक्ष्मण वाघमारे : सह विधी प्रमुख ,श्री कमलाकर सोनकांबळे: अक्कलकोट, श्री सागर कांबळे: बार्शी, श्री गोपाळ वाघमारे : करमाळा, श्री दशरथ वडतिले : कार्यकारिणी सदस्य, श्रीमती गौरीताई आमडेकर : कार्यकारिणी सदस्य, श्रीमती.ममता मादगुंडी : कार्यकारिणी सदस्य, श्री धीरज खंदारे : मोहोळ. अशा प्रकारे कार्यकारिणी निवड करण्यात आले आहे



## एस. बी. देशमुख यांच्या हस्ते साहित्याचे वितरण

## 'शिक्षकांचे आमदार' म्हणून तांबे यांच्या कार्याचा गौरव

# आ.सत्यजित तांबे यांच्या निधीतून सिन्नर तालुक्यातील २२ शाळांना 'पोडियम'चे वितरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : नाशिक विभागाचे पदवीधर आमदार . सत्यजित तांबे यांच्या स्थानिक विकास निधीतून सिन्नर तालुक्यातील २२ विविध शाळांना सांस्कृतिक मंच पोडियमचे वितरण नुकतेच करण्यात आले. तालुक्यातील महात्मा फुले विद्यालयात संपन्न झालेल्या या कार्यक्रमात पहिल्या टप्प्यातील शाळांना मान्यवरांच्या हस्ते साहित्याचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाचे सचिव . एस. बी. देशमुख उपस्थित होते.

श्री. एस. बी. देशमुख यांच्या हस्ते वितरण आणि मनोगत

याप्रसंगी महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाचे सचिव एस. बी. देशमुख यांच्या शुभहस्ते शाळांच्या मुख्याध्यापकांना पोडियमचे वितरण करण्यात आले. यावेळी बोलताना एस. बी. देशमुख म्हणाले की, शाळांच्या भौतिक गरजा पूर्ण करण्यासाठी लोकप्रतिनिधींचा निधी मिळवणे आणि त्याचा योग्य विनियोग करणे आवश्यक असते. तांबे साहेब यांनी शाळांची मागणी लक्षात घेऊन त्वरित हा निधी उपलब्ध करून दिला, ही अत्यंत भूषणावह बाब आहे. शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी अशा साहित्याची मोठी मदत होते.

या शाळांना करण्यात आले पोडियमचे वाटप:

कार्यक्रमात खालील शाळांच्या प्रतिनिधींनी मान्यवरांच्या हस्ते साहित्य स्वीकारले:




१. संजीवनी प्राथमिक विद्यामंदिर, सिन्नर (नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ) २. मातोश्री चंद्रभागाबाई व अयोध्याबाई चांडक कन्या विद्यालय, सिन्नर ३. शेठ ब. ना. सारडा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सिन्नर ४. सावित्रीबाई फुले प्राथमिक विद्यामंदिर, सिन्नर (सगर शिक्षण प्रसारक मंडळ) ५. जि. प. प्राथमिक शाळा, झापवाडी ६. देवपूर हायस्कूल व एस. जी. ज्युनियर कॉलेज, देवपूर ७. माध्यमिक विद्यामंदिर, मिरगाव (क्रांतिवीर वसंतराव नाईक शिक्षण संस्था) ८. जनता विद्यालय, कोमलवाडी (मराठा विद्या प्रसारक संस्था) ९. माध्यमिक विद्यामंदिर, चिंचोली १०. माध्यमिक विद्यालय, सोनांबे ११. श्री. डी. एस. शिंदे जनता विद्यालय, सायाळे १२. श्रीमान योगी शिवछत्रपती शेतकरी विद्यालय, गुळवंच १३. संत ज्ञानेश्वर प्राथमिक व संत तुकाराम माध्यमिक आश्रमशाळा, चापडगाव १४. सिन्नर भूषण सूर्यभानजी गडाख उच्च माध्यमिक विद्यालय, पंचाळे १५. श्री संत हरिबाबा विद्यालय, पांगरी १६. न्यू इंग्लिश स्कूल, मानोरी (रयत शिक्षण संस्था) १७. पाताळेश्वर माध्यमिक विद्यालय, पाडळी १८. नूतन माध्यमिक विद्यालय, वावी १९. न्यू इंग्लिश स्कूल, दापूर २०. जनता विद्यालय, सोनांबे २१. जि. प. प्राथमिक शाळा, नांदूर शिंगोटे २२. देवपूर हायस्कूल, देवपूर

**'शिक्षकांचे आमदार' म्हणून तांबे यांचा गौरव**

पदवीधर आमदार सत्यजित तांबे यांनी आपल्या निधीतून आतापर्यंत नाशिक विभागात कॉम्प्युटर, प्रोजेक्टर, वाचनालयासाठी पुस्तके आणि वर्गखोल्या देऊन शालेय गुणवत्ता वाढीसाठी मोठी मदत केली आहे. माजी आ. सुधीरजी तांबे यांचा वारसा पुढे नेत सत्यजित तांबे शिक्षकांच्या समस्या विधानभवनात हिरीरीने मांडत असल्याने, शिक्षक वर्गात त्यांची ओळख 'शिक्षकांचे आमदार' म्हणून होत आहे.

या सोहळ्याला सगर विद्या प्रसारक संस्थेचे सचिव नामदेवराव लोणारे, सिन्नर तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष . एल. डी. बेणके, दत्तात्रय गोळेसर, मंगलाताई झगडे, मधुकर देशमुख, डॉ. सुदर्शन धस, . पालवे एस. एन., . सनी गोडसे, . लहानभाऊ ढोणे आणि महेश रणमाळे यांसह अनेक शिक्षक व मुख्याध्यापक उपस्थित होते.

# शासकीय योजना व सर्व रुग्णालयांसाठी नियमित व्यावसायिक गॅस सिलेंडर उपलब्ध होणार : प्रभारी जिल्हाधिकारी कुलदीप जंगम

## आरोग्य, शिक्षण, समाज कल्याण व आदिवासी विकास विभागाने त्यांच्या योजना कार्यान्वित ठेवण्यासाठी आवश्यक व्यावसायिक गॅस सिलेंडरची मागणी तालुका निहाय प्रशासनाकडे सादर करावी

■ **सर्व पुरवठा निरीक्षकांनी घरगुती गॅसचा अवैध वापर होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी**

■ **व्यावसायिक गॅस सिलेंडरवर बंदी असली तरी घरगुती गॅस सिलेंडर नियमितपणे मिळणार, नागरिकांनी न घाबरण्याचे प्रशासनाचे आवाहन**

■ **घरगुती गॅस सिलेंडर बुकिंग केल्यानंतर शहरी भागात २५ दिवसात तर ग्रामीण भागात ४५ दिवसात मिळणार**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : मध्यपूर्व आशियातील युद्धजन्य परिस्थितीच्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील व्यावसायिक गॅस पुरवठा आवश्यक असणाऱ्या सर्व संबंधित शासकीय विभाग तसेच जिल्ह्यातील सर्व प्रकारचे रुग्णालय यांना व्यावसायिक गॅस पुरवठा मागणीप्रमाणे केला जाणार आहे. तरी संबंधित विभागांनी तालुका निहाय याद्या पुरवठा विभागाला उपलब्ध करून द्याव्यात त्याप्रमाणे संबंधित तालुक्यातील एजन्सी कडून व्यावसायिक गॅसचा पुरवठा संबंधित यंत्रणांना होणार असल्याची माहिती प्रभारी जिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित मध्यपूर्व आशियातील युद्धजन्य परिस्थितीच्या अनुषंगाने एलपीजी पुरवठा बाबतच्या बैठकीत श्री. जंगम मार्गदर्शन करत होते. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, शहर अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे, शिक्षणाधिकारी प्राथमिक कादर शेख, जिल्हा परिषदेचे महिला व बाल विकास विभागाचे जिल्हा समन्वयक प्रसाद मिरकले, समाज कल्याण च्या सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, महापालिकेच्या आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने, एचपीसीएल, बीपीसीएल, आयओसीएल कंपनीचे प्रतिनिधी यांच्यासह सर्व संबंधित अधिकारी तसेच तहसीलदार तालुका पुरवठा निरीक्षक उपस्थित होते.

प्र. जिल्हाधिकारी श्री. जंगम पुढे म्हणाले की, आदिवासी विकास विभाग, शिक्षण विभाग, समाज कल्याण जिल्हा परिषद व राज्य, आरोग्य जिल्हा परिषद, राज्य व महापालिका, इतर बहुजन विभागांनी शालेय पोषण आहार तसेच आश्रम शाळा, निवासी शाळा साठी आवश्यक असलेल्या व्यावसायिक गॅस सिलेंडरची मागणी तालुका निहाय पुरवठा विभागाला तात्काळ सादर करावी. त्या यादीप्रमाणे संबंधित तालुक्यातील गॅस पुरवठा एजन्सीला संबंधित यंत्रणेला व्यवसायिक गॅस पुरवठा करण्याबाबत निर्देश देण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले.

जिल्ह्यात एचपीसीएल, बीपीसीएल, आयओसीएल कंपनीच्या ९४ गॅस एजन्सी कडून घरगुती व व्यावसायिक गॅस सिलेंडरचा पुरवठा केला जातो. सद्यस्थितीमध्ये व्यावसायिक गॅस सिलेंडर पुरवठा बंद केलेला आहे. परंतु घरगुती गॅस सिलेंडर पुरवठा नियमितपणे सुरू असून नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता घाबरू नये व प्रशासनाला सहकार्य करावे. गॅस पुरवठा करणाऱ्या एजन्सी शी झालेल्या चर्चेनुसार किमान आठ ते दहा दिवसाचा घरगुती सिलेंडरचा स्टॉक उपलब्ध असून त्या कंपन्यांना नियमितपणे घरगुती गॅस पुरवठा होत असल्याने नागरिकांनी काळजी करण्यासारखे नसल्याचे प्रभारी जिल्हाधिकारी श्री. जंगम यांनी सांगितले.

जिल्ह्याच्या शहरी व ग्रामीण भागात कार्यरत असणाऱ्या पुरवठा विभागाच्या निरीक्षकांनी तालुकास्तरावर गठित करण्यात आलेले दक्षता पथके व भरारी पथकामार्फत जिल्ह्यात कुठेही अवैध गॅस सिलेंडरचा वापर होणार नाही या दृष्टीने अत्यंत दक्ष राहून काम करावे. अवैध गॅस वापर तक्रार किंवा माहिती मिळाल्यास तात्काळ त्या ठिकाणी धाडी टाकून कारवाही करावी. यासाठी शहर व ग्रामीण भागातील पोलीस विभागाने या पथकांना आवश्यक ते सहकार्य करावे. तसेच गॅस एजन्सी समोर नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केल्यास त्या ठिकाणी पोलीस संरक्षण उपलब्ध करून द्यावे, अशाही सूचना श्री. जंगम यांनी दिल्या.

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या चार हजार ९२ शाळा पैकी ३६०० शाळांना शालेय पोषण आहारासाठी घरगुती गॅस सिलेंडर पुरवठा केला जातो. जिल्ह्यातील सर्व अंगणवाड्यांना व्यावसायिक गॅस कनेक्शन दिलेले आहेत. तर १५० वसतिगृहांना वैयक्तिक गॅस कनेक्शन आहेत. राज्य समाज कल्याण विभागाच्या १६ वसतिगृहे व दोन आश्रम शाळांना व्यावसायिक गॅस कनेक्शन आहेत. इतर बहुजन मागास विभागाचे दोन वस्तीगृहे व ९७ आश्रम शाळा, जिल्हा परिषद आरोग्य विभाग ७७ प्राथमिक आरोग्य केंद्रांना व्यवसायिक गॅस पुरवठा केला जातो तर सोलापूर महापालिके अंतर्गत सर्व शासकीय रुग्णालय तसेच खाजगी रुग्णालयाला व्यावसायिक गॅस पुरवठा किती प्रमाणात आवश्यक आहे याबाबत सायंकाळपर्यंत प्रशासनाला सादर केल्या जाणार आहेत.




एचपीसीएल, बीपीसीएल, आयओसीएल कंपनीच्या प्रतिनिधी यांच्याकडून कळविण्यात आले की घरगुती वापर गॅस सिलेंडर किमान आठ ते दहा दिवस साठा उपलब्ध आहे. तसेच व्यावसायिक गॅस सिलेंडर पुरवठा अत्यावश्यक सेवा साठी मागणीप्रमाणे उपलब्ध केला जाणार आहे. तसेच घरगुती गॅस पुरवठा कंपन्यांकडून नियमितपणे सोलापूर जिल्ह्यात उपलब्ध केला जात असल्याने घरगुती गॅस सिलेंडरची कोणत्याही प्रकारची अडचण नसल्याची माहिती एचपीसीएलचे प्रतिनिधी विनोद कुमार यांनी दिली.

प्रारंभी जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी मध्यपूर्व आशियातील युद्धजन्य परिस्थिती पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्यात इंधन व गॅस पुरवठ्याच्या अनुषंगाने माहिती दिली. जिल्ह्यात ९४ गॅस एजन्सी मार्फत घरगुती व व्यावसायिक गॅस पुरवठा केला जातो. सद्यस्थितीमध्ये व्यावसायिक गॅस पुरवठा बंद असून घरगुती गॅस पुरवठा नियमितपणे सुरू आहे. घरगुती गॅस सिलेंडरची नोंदणी केल्यानंतर शहरी भागात २५ तर ग्रामीण भागात ४५ दिवसात सिलेंडर उपलब्ध केले जाणार आहे. सद्यस्थितीमध्ये जिल्ह्यात १२ लाख घरगुती गॅस तर दहा हजार आठशे व्यावसायिक गॅस सिलेंडर वापरकर्ते असल्याचेही त्यांनी सांगितले. त्याप्रमाणे जिल्ह्यात डिझेल व पेट्रोलचा पुरेसा पुरवठा निमितपणे होत असल्याचे सांगितले.

---

# अक्कलकोट शहरातील नगरसेवक सद्दाम शेरीकर मित्र परिवाराच्यावतीने दावत ए इफ्तार पार्टी उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/ अक्कलकोट : पवित्र रमजान महिन्याचे औचित्य साधून अक्कलकोट शहरातील आरिफ शेरीकर चौक मक्का मस्जिद शेजारी नगरसेवक तथा बांधकाम सभापती पै.सद्दाम शेरीकर, एस.एम.सोशल ग्रुप पंच तालीम अक्कलकोट मित्र परिवार यांच्या संकल्पनेतून सालाबादप्रमाणे पवित्र रमजान महिन्याचे मुस्लिम समाजाच्या पवित्र रमजान निमित्ताने रोजा दावत-ए-इफ्तार पार्टीचे शानदार आयोजन करण्यात आले होते.




यावेळी अक्कलकोट शहरातील असंख्य रोजदार मुस्लिम बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या इफ्तार पार्टीचा आनंद घेतला.

अक्कलकोट आमदार सचिन दादा कल्याणशट्टी, नगराध्यक्ष मिलन कल्याणशट्टी, उपनगराध्यक्ष ऋतुराज बंटी राठोड, आरोग्य सभापती अविनाश मडीखांबे, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष नूर अहमद(नन्नू)कोरबू, उपसभापती सागर कल्याणशट्टी,तम्मा मामा शेळके, मराठा समाज संघर्ष समिती अध्यक्ष मा.सुरेशचंद्र सूर्यवंशी (वकील काका), शाकीर पटेल यांच्या प्रमुख उपस्थितीत ' दावत ए इफ्तार' पार्टी संपन्न झाली.

सद्दाम शेरीकर व एस एस सोशल ग्रुप पंच तालीम कारंजा चौक मित्र परिवारातर्फे आमदार सचिन दादा कल्याणशट्टी, नगराध्यक्ष मिलन कल्याणशट्टी, नूतन अक्कलकोट पं.स उपसभापती सागर कल्याणशट्टी यांचा महमदहुसेन शेरीकर यांच्या हस्ते टोपी शाल व पुष्पहार घालून सत्कार व स्वागत करण्यात आला.

रोजा दावते इफ्तार पार्टीला मुस्लिम बांधवांसोबत हिंदू बांधवही उपस्थित होते नगरसेवक सद्दाम शेरीकर मित्र परिवाराच्या या 'दावत- ए- इफ्तार' पार्टीत हिंदू-मुस्लिम समाजातील एक्ये पुन्हा एकदा दिसून आले.

रोजा दावत- ए- इफ्तार पार्टीला अक्कलकोट शहर व परिसरातील नागरिक सहभागी झाले होते.

दावत- ए- इफ्त्यार पार्टीला आलेल्या सर्व मुस्लिम बांधवांचे स्वागत पै.सद्दाम शेरीकर व एस.एम.सोशल ग्रुप पंच तालीम अक्कलकोट यांनी केले.

या वेळी आमदार सचिन दादा कल्याणशट्टी, नगराध्यक्ष मिलन कल्याणशट्टी, उपनगराध्यक्ष ऋतुराज बंटी राठोड, आरोग्य सभापती अविनाश मडीखांबे, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष नूर अहमद(नन्नू)कोरबू, उपसभापती सागर कल्याणशट्टी तम्मा मामा शेळके,मा.सुरेशचंद्र सूर्यवंशी (वकील काका), यशवंत तात्या धोंगडे,नागू कुंभार,देविदास कवटगी,शाकीर पटेल,इरफान दावना, गुलाब साब तडमोड,लालअहमद अत्तार,नुरअहमद शेरीकर, महमदहुसेन शेरीकर,अशोक जाधव, शिव स्वामी, दत्ता कटारे,अकिल पैलवान,सुनील खवळे, सुनील सिद्धे, साळुंखे डॉक्टर,विक्रम हर्डीकर दयानंद दनुरे,अल्फात पटेल पत्रकार बंधू व मान्यवर पदाधिकारी व एस एस सोशल ग्रुप चे सर्व कार्यकर्ते व मुस्लीम बांधव उपस्थित होते.

सद्दाम शेरीकर व एस एस सोशल ग्रुप मित्रपरिवार यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते सोहेल फरास यांनी दिली.

---

# सहिष्णू समाजापुढे 'मुस्लिम प्रश्ना'चे मोठे आव्हान : प्रा. शेषराव मोरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




सहिष्णू हिंदू समाजामध्ये इस्लामबद्दल कमालीचे अज्ञान आहे. कुराणातील आयतांचा अर्धवट संदर्भ देऊन केवळ सहिष्णूता दाखवण्याचा प्रयत्न केला जातो; मात्र प्रत्यक्षात इस्लाममध्ये केवळ अल्लावरचीच श्रद्धा मान्य आहे, इतरांची नाही. त्यामुळे मूलभूत इस्लामचे सहिष्णू समाजासमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे, असे मत ज्येष्ठ अभ्यासक प्रा. शेषराव मोरे यांनी व्यक्त केले.

फर्ग्युसन महाविद्यालयाच्या ॲम्फी थिएटर येथे आयोजित 'मूलभूत इस्लामची शिकवण' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री.प्रमोद रावत, कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा पुण्याचे माजी खासदार श्री.प्रदीपदादा रावत व राजे शिवराय प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. महेश पवळे आदी मान्यवर उपस्थित होते. कुराण समजून घेण्यासाठी प्रेषित पैगंबरांचे चरित्र वाचणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगून प्रा. शेषराव मोरे म्हणाले की, प्रेषितांच्या चरित्रातून कुराणातील कोणती आयत कोणत्या प्रसंगात आली आहे, याचा बोध होतो. आज काही आयतांचा वापर 'इस्लाम सहिष्णू आहे' हे दाखवण्यासाठी केला जातो. मात्र, प्रत्यक्षात इस्लामला अल्लाशिवाय दुसरी कोणतीही श्रद्धा मान्य नाही. संपूर्ण जगाला इस्लामिक दृष्टिकोनातून श्रद्धावान करणे हे त्यांचे उद्दिष्ट आहे. अल्लाला न मानणाऱ्यांना शिक्षा देण्याचा अधिकारही ते स्वतःकडेच घेतात. इस्लामची शक्ती वाढल्यानंतर 'काफिरां'विरुद्ध जिहाद करणे तिथे अनिवार्य मानले जाते.

अध्यक्षीय भाषणात प्रदीप रावत म्हणाले, इस्लाम केवळ वेगळा पंथ किंवा पूजापद्धती नाही.

**ज्येष्ठ अभ्यासक प्रा. शेषराव मोरे यांचे पुणे येथे आयोजित व्याख्यानास प्रतिसाद**

त्यामुळे इस्लामच्या प्रश्नाकडे हिंदूंच्या सहिष्णू दृष्टिकोनातून पाहणे चुकीचे ठरते. मुस्लिमांकडे इस्लामच्या नजरेतूनच पाहायला हवे; कारण जगाच्या पाठीवर सहिष्णू समाजाचा असहिष्णू प्रवृत्तींशी संघर्ष अनिवार्य झाला आहे, तरच सहिष्णूता टिकेल. जोपर्यंत आपण आपला 'सिव्हिलायझेशनल डीएनए' (सांस्कृतिक वारसा) समजून घेत नाही, तोपर्यंत हा प्रश्न आपल्याला उमजणार नाही.

मक्का आणि मदिना संदर्भ: सुरुवातीच्या काळात मक्केमध्ये प्रेषितांचा इस्लाम स्वीकारणाऱ्यांची संख्या अल्प होती. त्यावेळी कुराणात आलेल्या आयत आणि मदिनेमध्ये इस्लामचे संख्याबळ वाढल्यानंतर आलेल्या आयत यांच्यात मूलभूत फरक आहे, अशी माहिती प्रा. शेषराव मोरे यांनी दिली. इस्लामचे सहिष्णू रूप दाखवण्यासाठी प्रामुख्याने मक्केतील आयतांचा संदर्भ दिला जातो; मात्र मदिनेमध्ये संख्याबळ वाढल्यानंतर, जे अल्लावर श्रद्धा ठेवत नाहीत (अश्रद्धावान), त्यांच्या विरोधात 'जिहाद' अनिवार्य आहे, असा संदेश आयतांमधून मिळतो, असेही त्यांनी नमूद केले.

डेक्कन एज्युकेशन सोसायटी, विवेक विचार मंच, स्वातंत्र्यवीर सावरकर अध्यासन केंद्र, भारत विकास परिषद, प्रवाह फाउंडेशन द्वारे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रणव पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

---

# आदिवासी भागातील शिक्षकांना एकस्तर वेतनश्रेणी लागू करण्याची मुख्याध्यापक संघाची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी



आदिवासी भागात कार्यरत असलेल्या शिक्षकांना एकस्तर वेतनश्रेणी लागू करण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी आज दिनांक १३ मार्च २६ शुक्रवार रोजी महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाचे सचीव -एस बी देशमुख, नाशिक जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष - प्रदीप सांगळे सचिव दीपक गायकवाड ,उपाध्यक्ष एल डी बेनके तसेच श्री .अहिरे आर.एच. (मुख्याध्यापक) व शिक्षकांच्या प्रतिनिधी मंडळाने उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्री.प्रकाशअहिरे साहेब यांना निवेदन सादर केले. आदिवासी व दुर्गम भागात कार्य करताना शिक्षकांना विविध अडचणींचा सामना करावा लागतो. वाहतूक, निवास, शैक्षणिक साधनसामग्रीचा अभाव तसेच प्रतिकूल परिस्थितीतही ते विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सातत्याने प्रयत्नशील असतात.

या पार्श्वभूमीवर आदिवासी भागातील शिक्षकांना न्याय्य वेतनश्रेणी मिळावी, त्यांच्या सेवेला योग्य मान्यता मिळावी आणि शैक्षणिक कार्य अधिक प्रभावीपणे पार पाडता यावे, यासाठी एकस्तर वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी करण्यात आली.

शिक्षक प्रतिनिधींनी दिलेल्या निवेदनात शासनाने या मागणीचा सकारात्मक विचार करून तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. उपशिक्षणाधिकाऱ्यांनी निवेदन स्वीकारून संबंधित मागणी वरिष्ठ स्तरावर पाठविण्यात येईल, असे आश्वासन दिले. सकारात्मक विचार करण्यात येईल असे सांगितले .

या वेळी एम डी काळे, आर एच आहिरे, आर .पी कदम, डी एस देसले, एस एन पाटील, आर एन डमारे, पी एस पाटील, एन जे वाघ, बी एस निकम , एस एस चौरे मुख्याध्यापक व शिक्षक संघटनेचे पदाधिकारी व अनेक शिक्षक उपस्थित होते.

---

**नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांनी दिली माहिती**

# अक्कलकोट नगरपरिषदेस पायाभूत सुविधेसाठी ९ कोटी ९५ लाख रुपये निधी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/अक्कलकोट : अक्कलकोट शहरातील नागरिकांना भेडसाविणाऱ्या दैनंदिन समस्यांची अडचण लक्षात घेऊन आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या पाठपुराव्याने नगरपरिषदेस ९ कोटी ९५ लाख रुपये एवढा निधी मंजूर झाल्याची माहिती नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांनी दिली आहे.



अक्कलकोट नगरपरिषदेच्या पायाभूत सुविधात वाढ होऊन शहरवासीय व स्वामभिंक्त यांच्या येणाऱ्या अडचणी यांचा विचार करून अक्कलकोट नगरपरिषद हद्दीतील स्वच्छता गृह आणि शौचालये यांच्या बांधकामे करण्यासाठी २ कोटी रुपये, अक्कलकोट नगरपरिषद हद्दीतील ॲडव्हेंचर पार्कच्या दुसऱ्या टप्पाच्या विकास कामासाठी २ कोटी ३५ लाख रुपये तसेच अक्कलकोट नगरपरिषद हद्दीतील रस्ते व गटारी यांच्या काँक्रीटीकारणासाठी ३ कोटी ८० लाख रुपये असे एकूण तीन कामासाठी सुवर्णजयंतीनगरोत्थान अभियान योजनेतून ८ कोटी १५ लाख रुपये असे असून त्याचप्रमाणे अक्कलकोट नगरपरिषद हद्दीतील दलित वस्ती सुधारणा योजनेसाठी १ कोटी २३ लाख रुपये तसेच नगरपरिषद हद्दीतील कालिका नगर येथील पिण्याच्या पाणी टाकीच्या बांधकामासाठी ५५ लाख रुपये निधी मंजूर झालेले आहेत. यातून अक्कलकोट शहराच्या सुरु असलेल्या मोठ्या प्रमाणावरील विविध विकास कामांची भर पडून पायाभूत सुविधात मोठी वाढ होऊन नागरिकांची येणारी अडचण दूर होण्यासाठी मदत होणार आहे.

या कामासाठी आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांचा सततचा पाठपुरावा आणि मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब , आणि पालकमंत्री जयकुमार गोरे साहेब यांचे सहकार्य लाभल्याचे मिलन कल्याणशेट्टी यांनी स्पष्ट केले.